INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 11 | DECEMBER – 2025

# नारायण सुर्वे यांच्या कवितांमधील शहरी जीवनाचे प्रतिबिंब : कामगार वर्ग, संघर्ष आणि सामाजिक वास्तव

**डॉ. गौतम बनसोडे**
**सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, येरवडा, पुणे.**

## प्रस्तावना:



मराठी साहित्याच्या इतिहासात एक निर्णायक वळण म्हणून नारायण सुर्वे यांच्या कवितेचा उल्लेख करावा लागतो. स्वातंत्र्योत्तर काळात जेव्हा मराठी कविता एका बाजूला रोमँटिक, व्यक्तिनिष्ठ आणि मध्यवर्गीय संवेदनशीलतेच्या कक्षेत फिरत होती, तेव्हा दुसऱ्या बाजूला मुंबईच्या गिरण्या, चाळी, फुटपाथ आणि झोपडपट्टू यांमध्ये जगणारे लाखो कष्टकरी आपल्या अस्तित्वाच्या लढाईत गुंतले होते. या कष्टकऱ्यांच्या जीवनाला, त्यांच्या वेदनांना, संघर्षाला आणि आशावादाला प्रथमच प्रामाणिकपणे, अनुभवाच्या खोलीतून मराठी कवितेत आणणारे कवी म्हणजे नारायण गंगाराम सुर्वे.

शहरी जीवन हे केवळ गगनचुंबी इमारती, कारखाने आणि प्रगतीचे प्रतीक नाही. ते शोषणाचे, अलिप्ततेचे, स्थलांतराचे आणि वर्गसंघर्षाचेही प्रतीक आहे. मुंबईच्या औद्योगिक विकासाबरोबरच निर्माण झालेला कामगार वर्ग, त्यांची दैनंदिन धडपड, रोटीकपडामकान या मूलभूत गरजांसाठीचा संघर्ष आणि त्यातून उदयास आलेले सामाजिक वास्तव हे सुर्वे यांच्या कवितेचे केंद्रबिंदू आहे. त्यांची कविता 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा', 'ऐसा गा मी ब्रह्म' आणि इतर रचनांमधून शहरी जीवनाचे हे बहुआयामी चित्र उभे करते.

सुर्वे यांची कविता केवळ वर्णनात्मक नाही. ती अनुभवजन्य आहे. त्यांनी स्वतः गिरणी कामगार, हमाल, घरगडी, शिक्षक अशी अनेक रूपे धारण केली होती. त्यामुळे त्यांच्या शब्दांना एक अस्सलपणा आणि ताकद प्राप्त झाली आहे. "ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती / दुकानांचे आडोसे होते, मोफत नगरपालिकेची फुटपाथ खुलीच होती" या ओळींमधून सुरू होणारे 'माझे विद्यापीठ' हे त्यांच्या जीवनाचे आणि कवितेचे सार आहे. हे विद्यापीठ म्हणजे औपचारिक शिक्षण संस्था नव्हे, तर मुंबईच्या रस्त्यांवरील, चाळींमधील आणि गिरण्यांमधील अनुभवविश्व आहे.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये नारायण सुर्वे यांच्या जीवनाचा आढावा, मराठी कवितेतील त्यांचे योगदान, कामगार वर्ग, संघर्ष आणि सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब यांचा सविस्तर अभ्यास केला आहे. कवितांमधील महत्त्वाच्या ओळींचा आधार घेऊन शहरी जीवनाचे चित्रण कसे साकारले गेले आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटी मूल्यमापन आणि समारोपाद्वारे त्यांच्या कवितेचे ऐतिहासिक आणि साहित्यिक महत्त्व अधोरेखित केले आहे.

## नारायण सुर्वे यांचे जीवन:

नारायण गंगाराम सुर्वे यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९२६ रोजी मुंबईत झाला. त्यांच्या जन्मदात्री आईने नवजात अर्भकाला कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ सोडून दिले. मुंबईतील इंडिया वुलन मिलमध्ये काम करणारे गिरणी कामगार गंगाराम कुशाजी सुर्वे आणि त्यांची पत्नी काशीबाई यांनी या अनाथ बालकाला उचलून घेतले आणि आपले नाव दिले — नारायण गंगाराम सुर्वे. परळच्या बोगद्याच्या चाळीत त्यांचे बालपण गेले. दारिद्र्य, उपासमार आणि संघर्ष हे त्यांच्या आयुष्याचे अविभाज्य भाग होते.

औपचारिक शिक्षण फारसे झाले नाही. दादर आणि अप्पर माहीम मराठी महापालिका शाळेत चौथीसातवीपर्यंत शिकले. पुढे स्वतःच्या हिमतीने वाचनलेखन शिकले. बालवयातच गिरणीत डोफर बॉय, हॉटेलात कपबशा विसळणारा पोऱ्या, घरगडी, दूध टाकणारा, हमाल अशी अनेक कामे केली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात कोहिनूर मिल्स आणि इतर गिरण्यांमध्ये काम केले. कामगार संघटनांशी संबंध आला. मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव पडला. रेड गार्ड म्हणूनही काम केले.

१९४८ मध्ये कृष्णाबाई साळुंके यांच्याशी विवाह झाला. खारजवळील झोपडपट्टीत राहिले. एकदा मुलगा बावीस दिवसांचा असताना झोपडे तोडले गेले आणि आठ दिवस फुटपाथवर राहावे लागले. नंतर मुंबई महापालिकेच्या शाळेत शिक्षक झाले. "सुर्वे मास्तर" म्हणून ओळखले जाऊ लागले.

कवितेची सुरुवात १९५० च्या दशकात झाली. १९५८ मध्ये 'नवयुग' मासिकात पहिली कविता प्रसिद्ध झाली. 'डोंगरी शेत माझं गं' हे गीत लोकप्रिय झाले. १९६२ मध्ये पहिला संग्रह 'ऐसा गा मी ब्रह्म' प्रकाशित झाला. १९६६ मध्ये 'माझे विद्यापीठ' आला आणि मराठी साहित्यविश्वात खळबळ माजली. त्यानंतर 'जाहीरनामा', 'सनद', 'नव्या माणसाचे आगमन' असे संग्रह आले. १९९५ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले.१९९८ मध्ये पद्मश्री पुरस्कार मिळाला. सोव्हिएत लँड नेहरू अवॉर्ड, कबीर पुरस्कार, जनस्थान पुरस्कार असे अनेक सन्मान मिळाले. १६ ऑगस्ट २०१० रोजी ठाणे येथे त्यांचे निधन झाले.

सुर्वे यांचे जीवन हेच त्यांच्या कवितेचे विद्यापीठ होते. अनाथ म्हणून जन्म कामगार कुटुंबात वाढ, गिरण्यांतील शोषण, फुटपाथवरील रात्री, शिक्षक म्हणून समाजसेवा – या सर्व अनुभवांनी त्यांच्या कवितेला आकार दिला. ते कधीही जातीचा, धर्माचा किंवा प्रारब्धाचा उल्लेख करीत नसत. "मी जन्मलो तेव्हा काही नाम धारण करून जन्मलो नाही. मात्र मी नसेन, तेव्हा या पृथ्वीच्या पाठीवर एक नाव ठेवून जाईन ते म्हणजे नारायण गंगाराम सुर्वे असे ते म्हणत.

## मराठी कवितेतील योगदान:

मराठी कवितेच्या आधुनिक प्रवाहात केशवसुत, बालकवी, मर्ढेकर आणि कुसुमाग्रज यांनंतर सुर्वे यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. मर्ढेकरांनी शहरी जीवनातील विस्कळितता आणि व्यक्तिनिष्ठ वेदना मांडल्या. कुसुमाग्रजांनी मानवतावाद आणि आशावाद दिला.सुर्वे यांनी मात्र कामगार वर्गाचे जीवन, त्यांची भाषा आणि त्यांचा संघर्ष थेट कवितेच्या मध्यवर्ती आणला.त्यांच्यापूर्वी मराठी कवितेत कामगार जीवन फारसे दिसत नव्हते. अण्णाभाऊ साठे यांनी लोकसाहित्य आणि गाण्यांद्वारे कामगारांचे जीवन मांडले होते,पण कवितेच्या क्षेत्रात सुर्वे हे पहिले कामगार कवी म्हणून ओळखले जातात. त्यांनी बोलीभाषा, मुंबईची मिश्र भाषा, कामगारांची बोलचाल कवितेत आणली. उच्चभ्रू संस्कृतनिष्ठ किंवा रोमँटिक भाषेला छेद देत त्यांनी सहज, प्रामाणिक आणि लढाऊ भाषा वापरली.

'ऐसा गा मी ब्रह्म' हा संग्रह क्रांतिकारी होता. त्यातील कवितांनी स्वातंत्र्योत्तर भारतातील कामगार वर्गाची वास्तविकता उघड केली. 'माझे विद्यापीठ'ने तर एक नवीन काव्यपरंपरा निर्माण केली. या संग्रहातील दीर्घ कविता म्हणजे कवीचे आत्मचरित्रच आहे. ती ७२ ओळींची रचना असून चार बंधांत विभागलेली आहे. या कवितेने मराठीकवितेला 'अनुभवविश्वाचे विद्यापीठ' दिले. सुर्वे यांनी केवळ कविताच लिहिल्या नाहीत. त्यांनी उर्दू कथांचे अनुवाद केले,लेखसंग्रह 'माणूस, कलावंत आणि समाज' लिहिला. कामगार चळवळीतील सभांमध्ये, गेट मीटिंग्समध्ये त्यांच्या कविता गाजल्या. त्यांची कविता केवळ वाचण्यासाठी नव्हती, तर ऐकण्यासाठी, जागृतीसाठी होती.

त्यांच्या कवितेने नंतरच्या दलित आणि प्रगतवादी साहित्यासाठी वाट मोकळी केली. नामदेव ढसाळ, बाबुराव बागूल, दया पवार यांसारख्या लेखकांना प्रेरणा मिळाली. पण सुर्वे यांची कविता दलित साहित्याच्या कक्षेत पूर्णपणे बसत नाही. ती वर्गसंघर्षावर आधारित आहे. जातीपेक्षा वर्ग हा त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू आहे. या अर्थाने ते मॅक्झिम गॉर्कीप्रमाणे महाराष्ट्राचे कामगार कवी ठरतात.

## कामगार वर्ग, संघर्ष आणि सामाजिक वास्तव:

नारायण सुर्वे यांच्या कवितेचा गाभा कामगार वर्ग, त्यांचा संघर्ष आणि शहरी सामाजिक वास्तव या त्रिसूत्रीभोवती फिरतो. मुंबईच्या औद्योगिक जीवनात जन्मलेल्या आणि वाढलेल्या या कवीने स्वतः गिरणी कामगार, हमाल, घरगडी, पोस्टरवाला आणि शिक्षक अशी अनेक रूपे धारण केली होती. त्यामुळे त्यांची कविता बाहेरून पाहणाऱ्या सहानुभूतीपूर्ण निरीक्षणाची नाही, तर आतून अनुभवलेल्या वेदनेची आणि लढाईची आहे. शहरी जीवन हे केवळ कारखाने, चाळी आणि रस्त्यांचे जग नाही; ते शोषणाचे, स्थलांतराचे, दारिद्र्याचे आणि तरीही जिद्दीने जगण्याचे जग आहे. सुर्वे यांनी या जगाला काव्यात्मक स्वरूपात उभे केले आणि मराठी साहित्यात कामगार वर्गाचे प्रामाणिक प्रतिबिंब निर्माण केले.

## कामगार वर्गाचे चित्रण:

सुर्वे यांच्या कवितेत कामगार हा केवळ पीडित किंवा दयापात्र प्राणी नाही. तो लढाऊ, जागरूक आणि भविष्याचा निर्माता आहे. सर्वात प्रसिद्ध आणि प्रभावी ओळी आहेत

***"कामगार आहे मी, तळपती तलवार आहे***
***रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे***
***कधी फाटका बाहेर कधी फाटका आत आहे***
***कामगार आहे मी, तळपती तलवार आहे***
***एकटाच आलो नाही, युगाचीही साथ आहे***
***सावध असा, तुफानाची हीच सुरुवात आहे"***

या ओळींमधून कामगार वर्गाचा आत्मविश्वास, संघटनात्मक शक्ती आणि क्रांतिकारी जाणीव स्पष्ट होते. रोटीचा प्रश्न रोजचा असला तरी युगाची साथ आहे, हे सांगून सुर्वे कामगाराला वैयक्तिक संघर्षापलीकडे सामूहिक शक्तीचे भान देतात. ही कविता कामगार सभांमध्ये, गेट मीटिंग्समध्ये आणि आंदोलनांमध्ये वारंवार म्हटली जात असे. ती घोषणा बनली होती.

'गिरणीची लावणी' ही कविता गिरणी कामगारांच्या दैनंदिन जीवनाचे जिवंत चित्रण करते. सकाळी सात वाजता भोंगा वाजतो, पहिली पाळी सुरू होते, चाक गरगर फिरते, सूत भरभर निघते. कामगारांच्या घामातून वसुंधरा नटते. लावणीच्या रूपात लिहिलेली ही रचना कामगारांच्या श्रमाचे गौरव करते आणि त्याच वेळी शोषणाची जाणीव करून देते. "निमूशन धन आम्ही सारं, मालक असून झालो चोर" अशा ओळींमधून वर्गसंघर्ष थेट मांडला आहे. गिरणी ही केवळ कापड तयार करणारी यंत्रणा नाही, तर कामगारांच्या आयुष्याला आकार देणारी आणि त्याच वेळी पिळवणारी व्यवस्था आहे.

'पोस्टर' कवितेत शहरी गरीबांचे आणखी एक रूप दिसते. चार घरांचे चार माणसे रात्री पोस्टर चिपकवण्यासाठी बाहेर पडतात. बूढा अंधार लंगडत येतो. हणम्या रे, ही सीढी घे – मी लोई लावतो. सिंदेची बायको चांगली लोई बनवते, पण बाप खबीस आहे. इसल्याची आई गरम बाई आहे. कुत्रा पायाखाली आला तर खालीपिली बूम. ही कविता रात्रीच्या मुंबईची, पोस्टरवाल्यांची, त्यांच्या कुटुंबाची आणि त्यांच्या छोट्या छोट्या आनंदांची व वेदनांची आहे. शहरी जीवनातील अनौपचारिक कामगारांचे हे चित्रण अत्यंत जिवंत आणि वास्तववादी आहे.

'माझे विद्यापीठ' या दीर्घ कवितेत कामगार वर्गाचे जीवन अधिक खोलात येते. ***"ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती दुकानांचे आडोसे होते, मोफत नगरपालिकेची फुटपाथ खुलीच होती."*** ही सुरुवातच अनाथपणा आणि फुटपाथवरील जीवनाचे सार सांगते. पुढे टोपलीखाली जग झाकणारा अंधार, उठवळ आयुष्य, अनुभवाचे विद्यापीठ – हे सर्व कामगार वर्गाच्या सामूहिक अनुभवाचे रूपक बनते. सुर्वे यांनी स्वतःचे जीवन कामगार वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारे बनवले.

## संघर्षाचे विविध रूपे:

सुर्वे यांच्या कवितेत संघर्ष हा बहुआयामी आहे. वैयक्तिक पातळीवर रोटी, कपडा, मकान या मूलभूत गरजांसाठीचा संघर्ष आहे. "भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बर्बाद झाली" ही ओळ किती मार्मिक आहे! चंद्र म्हणजे आकांक्षा, स्वप्न, उन्नती, पण भाकरीच्या शोधात आयुष्य संपते. ***"दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दु:खात गेले हिशोब करतो आहे आता किती राहिलेत डोईवर उन्हाळे"*** अशा ओळींमधून दैनंदिनजीवनातील थकवा आणि निराशा व्यक्त होते. पण निराशा पूर्ण नाही. संघर्षातून शिकणे आणि पुढे जाणे हा सुर्वे यांचा स्थायीभाव आहे.

स्थलांतराचा संघर्षही महत्त्वाचा आहे.'मुंबई' कवितेत सुर्वे म्हणतात

***"पटकूर खांद्यावर टाकून, सह्याद्री घाट उतरून...***
***माझा बाप तुझ्या दारावर उभा राहिला श्रम घेऊन...***
***कळू आले तेव्हापासून, डब्बा घेऊन साच्यावर गेलो...***
***घडवतो लोहार हातोड्या, तसाच घडवत गेलो..."***

ग्रामीण भागातून मुंबईत येणारे शेतकरी, कामगार आपल्या स्वप्नांसह येतात, पण शहर त्यांना पिळते. चाळी नरकासारख्या आहेत. रस्ते स्वच्छ करणारे कामगार कधी दंडुकेवाल्यांसारखे उठवले जातात. पुन्हा संसार थाटतात.***"असे आम्ही लक्षावधी... राबता खपता आयुष्य, मेणबत्तीसम विझून घेतो..."*** ही ओळ स्थलांतरित कामगारांच्या सामूहिक दुःखाचे प्रतीक आहे. मुंबईची सौंदर्ये – कारखाने, गिरण्या, झोतभट्ट्या, गोद्या, गजबजलेले रस्ते कामगारांनीच घडविली आहेत. "हे कारखाने, गिरण्या आमुच्या दुनियेचे अलंकार... झोत भट्टीत शेकावे पोलाद, तसे आयुष्य छान शेकले..." असे म्हणून सुर्वे कामगारांच्या श्रमाचे गौरव करतात आणि त्याच वेळी शोषणाची जाणीव करून देतात.

संघटित संघर्षही दिसतो. संप, आंदोलने, कामगार संघटना यांचा उल्लेख कवितेत आहे.'कार्ल मार्क्स' कवितेत मार्क्सवादी विचारांचा प्रभाव स्पष्ट आहे. सुर्वे यांनी स्वतः कामगार चळवळीत भाग घेतला होता. त्यांच्या कवितेत हिंसा अनिवार्य नाही, पण अन्याय सहन करणेही शक्य नाही. "थांब" कवितेत ***"नच जुमानलेस तर खड्ग हाती घेईन सज्जना!"*** असा इशारा आहे. संघर्ष हा केवळ आर्थिक नाही, तर मानवी अस्तित्वाचा आणि सन्मानाचा आहे.

### सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब:

शहरी सामाजिक वास्तव सुर्वे यांच्या कवितेत अत्यंत कठोर आणिबहुआयामी स्वरूपात येते. वेश्या, देवदासी, नालबंद, खाटीक, ड्रायव्हर, पोर्टर, क्रेनवाला, हमाल, शिगवाला या सर्व वंचितांचे जीवन आहे. एका कवितेत वेश्या आपल्या मुलाला शाळेत दाखल करायला येते आणि मास्तराला "तुमचंच नाव लिवा" असे विनवीते. ही घटना सुर्वे यांच्या आयुष्यात घडली होती. त्यांच्या आईसारखीच ही आईही आपल्या मुलाला सुरक्षित भविष्य हवे होते. शहरी जीवनातील नैतिकतेचे दुहेरी मापदंड, स्त्री शोषण आणि मातृत्वाची तडफ यांचे चित्रण येथे आहे.

'माझी आई' कवितेत सुर्वे यांनी आपल्या दत्तक आईचे चित्रण केले आहे.तारे विझू लागतात, भोंगे वाजू लागतात, दिंड्या जातात. आई ममतेने सांगते नका बसू कुणाशी भांडत, वर दोन पैसे मिळत. दसऱ्याच्या आदल्या दिवशी मुलांना मिल दाखवून खाऊ घालते. एक दिवस तिला गाडीतून आणले उघडे डोळे, तोंडातून रक्त. "आधीचे नव्हतेच काही, आता आईदेखील नाही" ही शेवटची ओळ हृदय पिळवटून टाकते. कामगार कुटुंबातील आईचे कष्ट, माया आणि अचानक हरवणे – हे शहरी गरीबांच्या जीवनाचे वास्तव आहे.

चाळींमधील गर्दी, झोपडपट्ट्यांतील अस्वच्छता, फुटपाथवरील रात्री, गिरण्यांतील अपघात, बेरोजगारी, ठेकेदारी यांचे वर्णन वास्तववादी आहे. पण निराशा नाही. आशावाद आहे. "नव्या माणसाचे आगमन" या संग्रहात भविष्यातील समतावादी समाजाचे स्वप्न आहे. रोटी कपडामकान या मूलभूत गरजांपलीकडे सांस्कृतिक आणि मानवी गरजाही हव्यात असा आग्रह आहे. सुर्वे यांची कविता 'रोटी प्यारी खरी, आणखी काही हवे आहे' असे सांगते.

शहरी जीवनातील यांत्रिकता आणि अलिप्तताही दिसते. यंत्रयुगाने माणसाला यंत्र बनविले आहे. पण सुर्वे यांची कविता माणसाला माणूस बनवते. त्यांनी ईश्वरवाद, प्रारब्ध किंवा जातीचा कधीही उल्लेख केला नाही. वर्गसंघर्ष हा त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू आहे. शहरी सामाजिक वास्तवात जातिव्यवस्था आणि वर्गव्यवस्था एकमेकांत गुंतलेली असली तरी सुर्वे वर्गावर भर देतात.

***'डोंगरी शेत माझं गं'*** हे गीत ग्रामीणशहरी संक्रमणाचे चित्रण करते. डोंगरी शेत, कवळ्याचे भारे, आडाचे पाणी, तान्ह्याचे रडणे, सावकाराची जुलूमशाही – हे सर्व स्थलांतराच्या पूर्वपीठिकेचे आहे. शेतकरी मुंबईत येतो, पण शहरातही शोषण सुरूच राहते.

अशा प्रकारे नारायण सुर्वे यांच्या कवितेत कामगार वर्ग, संघर्ष आणि सामाजिक वास्तव हे एकमेकांत विणलेले आहेत. *गिरणी, चाळ, फुटपाथ, पोस्टर, लावणी, आई, मुंबई* या प्रतिमांद्वारे त्यांनी शहरी जीवनाचे संपूर्ण चित्र उभे केले आहे. ही कविता केवळ वर्णन करीत नाही, तर जागृती करते, प्रेरणा देते आणि बदल घडवण्याची ताकद देते. आजही अनौपचारिक कामगार, स्थलांतरित मजूर आणि शहरी

गरीबांच्या जीवनात या कवितांचे प्रतिबिंब दिसते. सुर्वेयांनी मराठी कवितेला कामगार वर्गाचे विद्यापीठ दिले आणि ते विद्यापीठ आजही खुले आहे.

नारायण सुर्वे यांच्या कवितेचे मूल्यमापन करताना काही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे अनुभवनिष्ठता त्यांची कविता पुस्तकी नाही. ती जगलेल्या जीवनातून आलेलीआहे. त्यामुळे तिची ताकद वाढते. दुसरी गोष्ट म्हणजे भाषा. सहज़बोलकी, मुंबईची भाषा वापरून त्यांनी कवितेची कक्षा विस्तृत केली. तिसरी गोष्ट म्हणजे आशावाद. निराशावादी वास्तववादी नसूनकृतिशील आशावादी आहेत. काही समीक्षाकारांच्या मते त्यांची कविता प्रचारात्मक आहे. मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव जास्त आहे. पण ही टीका अपुरी आहे. कारण त्यांची कविता प्रचार करत नाही, ती अनुभव सांगते. प्रचार तर आलाच, पण तो अनुभवातून. तुलनात्मक दृष्टीने पाहता अण्णाभाऊ साठे यांच्या लोकसाहित्याशी नाते आहे, पण कवितेच्या स्वरूपात सुर्वे वेगळे आहेत. मर्ढेकरांच्या शहरी वेदनेपेक्षा सुर्वे यांची कविता अधिक सामूहिक आणि लढाऊ आहे. कुसुमाग्रजांच्या मानवतावादापेक्षा ती अधिक वर्गकेंद्रित आहे.

आजच्या काळात गिरण्या बंद झाल्या, मुंबईचे स्वरूप बदलले, पण कामगार वर्गाचे संघर्ष संपले नाहीत. अनौपचारिक क्षेत्र ठेकेदारी, स्थलांतर या नवीन रूपांत संघर्ष सुरू आहे. त्यामुळे सुर्वे यांची कविता आजही प्रासंगिक आहे. ती केवळ ऐतिहासिक दस्तऐवज नाही, तर जिवंत प्रेरणा आहे.समीक्षकांनी त्यांना ‘कष्टकऱ्यांचा युगप्रवर्तक कवी, ‘मराठीचे गॉर्की’, ‘जनकवी’ अशी विशेषणे दिली आहेत. हे योग्यच आहे. त्यांनी मराठी कवितेला सामाजिक बांधिलकी दिली आणि तिची कक्षा तळागाळापर्यंत विस्तारली.

## समारोप:

नारायण सुर्वे यांच्या कवितांमधील शहरी जीवनाचे प्रतिबिंब हे कामगार वर्गसंघर्ष आणि सामाजिक वास्तवाचे सजीव दर्शन आहे. त्यांनी मुंबईच्या औद्योगिक जीवनातील वेदना, शोषण, स्थलांतर, दारिद्र्य आणि त्यातून उदयास आलेला आशावाद यांना काव्यात्मक रूप दिले. ‘माझे विद्यापीठ’ हे त्यांचे जीवन आणि कवितेचे प्रतीक आहे. फुटपाथ हे त्यांचे विद्यापीठ होते आणि त्या विद्यापीठाने मराठी साहित्याचे नवे अध्याय लिहिले.सुर्वे यांचीकविता आम्हाला सांगते की, शहरी जीवन केवळ प्रगतीचे प्रतीक नाही. ते संघर्षाचे, वर्गसंघर्षाचे आणि मानवी जिद्दीचेही प्रतीक आहे.“कामगार आहे मी, तळपती तलवार आहे” ही घोषणा आजही प्रेरणादायी आहे. त्यांनी मराठी कवितेला अनुभव, संघर्ष आणि आशावाद दिले. या अर्थाने तेकेवळ कवी नव्हते, तर समाजशिक्षक आणि क्रांतिकारी होते. भविष्यातील संशोधकांना सुर्वे यांच्या कवितेचा अभ्यास कामगार इतिहास, शहरी समाजशास्त्र आणि प्रगतवादी साहित्याच्या संदर्भात अधिक खोलात करावा लागेल. त्यांची कविता म्हणजे महाराष्ट्राच्या कामगार वर्गाचाजाहीरनामा आहे.

## संदर्भ सूची:

१) सुर्वे, नारायण. *माझे विद्यापीठ*. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, १९६६.
२) सुर्वे, नारायण. *ऐसा गा मी ब्रह्म*. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, १९६२.
३) सुर्वे, नारायण. *जाहीरनामा*. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, १९७५.
४) सुर्वे, नारायण. *नव्या माणसाचे आगमन*. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, १९९५.
५) सुर्वे, नारायण. *सनद* (संपादक : कुसुमाग्रज). मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, १९८२.
६) सुर्वे, नारायण. *सुर्वे : नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता* मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
७) कुसुमाग्रज (संपादक).*निवडक नारायण सुर्वे*.
८) सबनीस, श्रीपाल. *सुर्व्यांच्या काव्याची इहवादी समीक्षा*.
९) सुर्वे, कृष्णाबाई. *मास्तरांची सावली*.
१०) पाध्ये, दिगंबर. नारायण सुर्वे यांच्या कवितेवरील समीक्षा लेख (विविध नियतकालिके व ग्रंथ).
११) तापस, विजय (संपादक). *गवसलेल्या कविता*.
१२) मराठी विश्वकोश व विविध साहित्यिक नियतकालिके (लोकमत, सामना, साप्ताहिक सकाळ इ.) मधील सुर्वे यांच्यावरील विशेष लेख व जन्मशताब्दी विशेषांक (२०२५-२६).